अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०१ चा शपथेवर जबाब
माझे नांव — दादासाहेब निवृत्ती हरणे,
माझे वय – ४५ वर्ष, धंदा : पो. हे. कॉ. बक्कल नं.७०९.
राहणार – जालना, ता. जि. जालना.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही. व्ही. नगरकर यांच्यामार्फत सूरू**

०१. दि.०३.०९.२०१८ रोजी मी सदर बाजार पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी फिर्यादी निलेश चत्रभुज शिंदे हे पोलीस ठाणे येथे फिर्याद देण्यासाठी आले होते. त्यांनी आरोपीकडुन पैसे ऊसणे घेतले होते व सदर पैसे परत करुनही आरोपी त्यांना त्रास देत होता अशी फिर्यादीची तक्रार होती. फिर्यादीच्या म्हणण्याप्रमाणे दि.०३.०९.२०१८ रोजी आरोपीने फिर्यादीला हॉटेलवर बोलावले व त्याला पैशांची मागणी केली. तेंव्हा फिर्यादी आरोपीला म्हणाला की, मी तुमचे पैसे पुर्ण परत केले आहेत. त्यावर आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व जिगा कांबळे यांनी कांदा कापण्याच्या चाकुने फिर्यादीच्या हातावर मारले. त्यामुळे सहा टाके पडल्याचे फिर्यादीने सांगितले. दिपक ठाकुर याने लाकडी काठीने दोन्ही पायावर मारले. वरील प्रमाणे हकीगत सांगितल्यानंतर फिर्याद नोंदवुन घेतली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकुर फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२८** देण्यात येते. छापील प्रथम खबर अहवाल दाखविली असता त्यावर फिर्यादीची सही आहे. त्यास **नि.क्र.२९** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. डि. डी. सोनवणे–**

०२. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे फिर्याद नोंदविली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादवर फिर्यादीची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/–

(सि. म. पाडोळीकर)

दि. ०४.०२.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.